Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date: 16 April 2024
Time: 7.10 AM to 7.20 AM
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक: १६ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

***ठळक बातम्या***

- **लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत साडे चार हजार कोटी रुपयांहून अधिकची प्रलोभनं जप्त**
- **तिसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठी उस्मानाबाद इथं तीन तर लातूर इथं एक अर्ज दाखल**
- **राज्य कर निरीक्षक संवर्गाच्या एकूण १५९ पदांचा अंतिम निकाल काल जाहीर**
- **छत्रपती संभाजीनगर महापालिकेकडून विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबीरांना प्रारंभ**
- **देशात यंदा सरासरीच्या तुलनेत १०६ टक्के पावसाचा अंदाज**

**आणि**

- **आयपीएल क्रिकेट स्पर्धेत धावांचा डोंगर रचत हैदराबादचा बंगळुरू संघावर विजय**

***सविस्तर बातम्या***

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगानं एक मार्चपासून आतापर्यंत, सुमारे साडे चार हजार कोटी रुपयांहून अधिकची प्रलोभनं जप्त केली आहेत. निवडणूक इतिहासात आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई आहे. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या काळात, एकूण तीन हजार ४७५ कोटी

रुपयांची प्रलोभनं जप्त करण्यात आली होती. यंदा मात्र, मतदानाचा पहिला टप्पा सुरु होण्यापूर्वीच चार हजार ६५० कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रलोभनं, आयोगाच्या पथकांनी देशभरातून जप्त केली.

या कारवाईत राजस्थान सर्वात प्रथम, गुजरात दुसऱ्या तर तमिळनाडू तिसऱ्या क्रमांकावर आहे. या राज्यात अनुक्रमे ७७८ कोटी, ६०५ कोटी आणि ४६० कोटींहून अधिकचं साहित्य जप्त करण्यात आलं. महाराष्ट्रात आतापर्यंत ४३१ कोटी ३४ लाख रुपयांचं साहित्य जप्त करण्यात आलं असून, यामध्ये २१३ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ, ६९ कोटीचे मौल्यवान धातू, ७९ कोटींच्या भेटवस्तू तर ४० कोटी रुपये रोख रकमेचा समावेश आहे.

दरम्यान, या कारवाईत प्रवाशांना विनाकारण तपासणीला सामोरं जावं लागत असल्याचं वृत्त माध्यमांमधून प्रसारित झालं होतं. ही बाब गांभीर्याने घेत निवडणूक आयोगानं मार्गदर्शक सूचना जारी करत, पर्यटक आणि नागरिकांना या तपासणीदरम्यान सौजन्याची वागणूक देण्याची सूचना केली आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी काल उस्मानाबाद मतदार संघातून तीन तर लातूर मतदार संघातून एक उमेदवारी अर्ज दाखल झाला.

उस्मानाबाद इथं राष्ट्रीय समाज दलाकडून आर्यनराजे शिंदे, विश्व शक्ती पार्टीकडून नवनाथ दुधाळ तर अर्जुन सलगर यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले. लातूर लोकसभा मतदार संघातून क्रांतिकारी जय हिंद सेनेचे भिकाजी जाधव यांनी एक अर्ज दाखल केला.

दरम्यान, उस्मानाबाद इथून काल २३ जणांनी ५९ अर्जांची तर लातूर इथून २४ जणांनी ४७ अर्जांची उचल केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

कोल्हापूर आणि हातकणंगले या दोन्ही लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार अनुक्रमे संजय मंडलिक आणि धैर्यशील माने यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत काल उमेदवारी अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, भाजप नेते चंद्रकांत पाटील, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कोल्हापूर मतदार संघातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी बैलगाडीतून शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याआधी

त्यांनी दसरा चौकातल्या मैदानावर सभा घेतली. हातकणंगले लोकसभा मतदारसंघासाठी पाच उमेदवारांनी नऊ अर्ज काल दाखल केले.

सांगली इथून काँग्रेसचे विशाल पाटील यांनी अपक्ष म्हणून तर हिंदुस्थान जनता पार्टी तर्फे सतीश कदम यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केले. महाविकास आघाडीने सांगलीतून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पैलवान चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केलेली आहे. मात्र काँग्रेसचे विशाल पाटील यांनी या जागेवर आपला दावा कायम ठेवला आहे.

सातारा लोकसभा मतदार संघात आमदार शशिकांत शिंदे यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातून आपला उमेदवारी अर्ज सादर केला.

वंचित बहुजन आघाडीचे राहुल गायकवाड आणि रमेश बारस्कर यांनी अनुक्रमे सोलापूर तसंच माढा लोकसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केले.

रायगड लोकसभा मतदार संघातून इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्यासह पाच उमेदवारांनी काल अर्ज दाखल केले.

****

निवडणूक आयोगाच्यावतीनं मतदार जागृती उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय तसंच जिल्हानिहाय सदिच्छादूत, मतदारांना मतदानाचं आवाहन करणार आहेत. परभणीत संकर्षण कऱ्हाडे, प्रशांत पाईकराव, शुभम म्हस्के, सुनील तुरुकमाने आणि डॉ. राजगोपाल कलानी, नांदेड इथं भाग्यश्री जाधव, सृष्टी जोगदंड आणि कपिल गुडसुरकर, बीड इथं योगेश्वर घाटबंधे, मयुरी लुते आणि प्रमिला चांदेकर, लातूर इथं बसवराज पैके, मेघा पवार आणि सृष्टी जगताप, जालना इथं किशोर डांगे, डॉ. निकेश मदारे आणि निशा पुरी, औरंगाबादमध्ये नवेली देशमुख, उस्मानाबादमध्ये राहुल लखाडे, आणि हिंगोली साठी महेश खुळखुळे हे सदिच्छा दूत आहेत. हे सर्वजण समाज माध्यमं, मुद्रित माध्यमं आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांबरोबरच जाहिरातफलक, भित्तीपत्रकाद्वारे मतदारांना मतदानाचं आवाहन करत आहेत.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ५ नोव्हेंबर रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट - ब सेवा मुख्य परीक्षा - २०२३ मधल्या राज्य कर निरीक्षक संवर्गाच्या एकूण १५९ पदांचा अंतिम निकाल काल जाहीर झाला. या परीक्षेत रत्नागिरी जिल्ह्यातले अवधूत दरेकर हे राज्यात प्रथम आले आहेत. महिला वर्गवारीतून पुणे जिल्ह्यातल्या आश्लेषा जाधव, तर मागासवर्गवारीतून कोल्हापूर

जिल्ह्यातले रोहित बेहेरे हे राज्यात प्रथम आले आहेत. अधिक माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन आयोगानं केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीनं मुलांसाठी उन्हाळी शिबीराला कालपासुन प्रारंभ झालं. मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते या शिबीराचं उद्घाटन करण्यात आलं. किराडपुरा भागात उर्दू शाळा क्रमांक एक मध्ये तसंच मनपाच्या प्रियदर्शनी विद्यालयात सुरू झालेल्या या १५ दिवसीय शिबीरात सकाळी साडे सात ते साडे दहा या वेळेत मुलांना क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, स्केटिग सारखे विविध क्रीडा प्रकार, चित्रकला, मातीकला, ओरिगामी, कथाकथन, सामान्य ज्ञान, संगीत, समूहगीत, समूह नृत्य आदी कलाप्रकार शिकवले जाणार आहेत. इयत्ता पहिली ते आठवीचे विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत.

****

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून अग्निशमन सेवा सप्ताहाला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत काल प्रारंभ झाला. याअंतर्गत २० एप्रिलपर्यंत अग्निशमन सेवाबाबत जनजागृती केली जाणार आहे. आग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज जिल्हाधिकारी राऊत यांनी यावेळी व्यक्त केली.

****

देशात यावर्षी पर्जन्यमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता भारतीय हवामान खात्यानं व्यक्त केल आहे. एक जून ते ३० सप्टेंबर, या चार महिन्यांत देशात सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं केंद्रीय भूविज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ एम. रविचंद्रन यांनी दिल्ली इथं आयोजित पत्रकारपरिषेदत सांगितलं. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नैऋत्य मोसमी पावसाचा सुधारित अंदाज जाहीर केला जाईल.

****

दरम्यान, राज्यात काल सर्वाधिक ४२ अंश सेल्सिअस तापमान मालेगाव इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात बीड इथं ३८ पूर्णांक नऊ, छत्रपती संभाजीनगर ३७ पूर्णांक चार, तर नांदेड इथं ३६ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तापमानाची नोंद

झाली. नाशिक इथं काल ४० अंश सेल्सिअस तापमान होतं, तर जिल्ह्यातल्या सुरगाणा, दिंडोरी तालुक्यात काल अवकाळी पाऊस झाला.

****

इंडियन प्रिमियर लीग – आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल सनरायजर्स हैदराबादने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा २५ धावांनी पराभव केला. हैदराबादच्या संघाने प्रथम फलंदाजी करत २० षटकात २८७ अशी विक्रमी धावसंख्या उभी केली. प्रत्युत्तरादाखल बंगळुरुचा संघ सात बाद २६२ धावाच करु शकला. आज या स्पर्धेत कोलकाता इथं कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे.

****

हिंगोली इथल्या बाजार समितीच्या हळद मार्केट यार्डात काल विक्रमी २० हजार क्विंटल हळदीची आवक झाली. या सर्व हळदीचं मोजमाप करण्यासाठी चार दिवसांचा कालावधी लागणार आहे. दरम्यान, हळदीच्या भावात क्विंटलमागे जवळपास पाचशे रुपयांची घसरण झाल्याचं शेतकऱ्यांनी सांगितलं.

****

लातूर स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. प्रतिभा पाटील तर सचिवपदी डॉ. मनिषा बरमदे यांची तर, संघटनेच्या कोषाध्यक्षपदी डॉ. अनुसया वलसे यांची निवड करण्यात आली. काल झालेल्या आरोग्य परिषदेत नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा पार पडला. या परिषदेत शहरातल्या १२५ डॉक्टरांनी सहभाग घेतला होता.

****

लोकसभा निवडणुकीसाठी औरंगाबाद मतदार संघात चौथ्या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी १८ एप्रिलपासून नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे. काल जिल्हाधिकारी कार्यालयात या संपूर्ण प्रक्रियेची रंगित तालीम घेण्यात आली. या साठीच्या सर्व टप्प्यांचा बारकाईने अभ्यास करुन सर्व यंत्रणेच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, यांच्यासह संबंधित अधिकारी तसंच कर्मचारी या प्रक्रियेत सहभागी झाले होते.

****

नांदेड जिल्ह्यात मतदार जनजागृती उपक्रमांतर्गत जिल्ह्यातल्या वैद्यकीय संघटनांनी मतदान करणाऱ्या नागरिकांना २६ आणि २७ एप्रिलला उपचार शुल्कामध्ये सूट देण्याचा निर्णय घेतला आहे.दरम्यान, नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीनं काल शहरातल्या बसस्थानकावर स्वीप समितीतर्फे विविध उपक्रमांतर्गत मतदार जनजागृती करण्यात आली.

****